प्रकरण दुसरे

# “ सातारा शहर व सातारा शहरातील वैदुंचे स्थान ”

## प्र क र ण 2 रे.

## सातारा शहर व सातारा शहरातील वैदुंचे स्थान

सातारा हे डोंगरद-यात वसलेले शहर आहे. ते जिल्हयाचे ठिकाण असून दक्षिण महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक ठिकाण आहे. हे शहर अजिंक्यता-याच्या पायथ्याला पश्चिम दिशेला पुणे बंगलोर राष्ट्रीय महामार्ग नं. 4 वर वसलेले आहे.


अ) **स्थान** ... सातारा शहराचा अक्षवृत्तीय आणि रेखावृत्तीय विस्तार अनुक्रमे 17⁰ 41' 30" ( उत्तर ) आणि 74⁰ 1' 4" ( पूर्व ) आहे. त्याची समुद्र सपाटीपासून उंची 679 मीटर आहे. त्याने एकूण 8.16 स्क्वे.कि.मी. इतके क्षेत्र व्यापलेले आहे. त्याच्या दक्षिणेला कोल्हापूर हे शहर 122 कि.मी. अंतरावर उत्तरेला पुणे हे शहर 115 कि.मी. अंतरावर आहे. मुंबई सारखे व्यापारी, शैक्षणिक, सर्वजाती समावेशक शहर सातारपासून 271 कि.मी. दूर आहे. वाई व महाबळेश्वर ही थंड हवेची ठिकाणे सातारच्या पश्चिमेस असून पूर्वेला सांगली हे शहर 122 कि.मी. दूर आहे व सोलापूर हे शहर 160 कि.मी. दूर आहे. रत्नागिरी हे शहर सातारच्या पश्चिमेला 200 कि.मी. अंतरावर आहे.

आ) **लोकसंख्या** ... 1991 च्या जनगणनेनुसार सातारची लोकसंख्या 95,133 असून त्यापैकी 49,757 पुरुष व 45,379 स्त्रीया आहेत. शहरात एकूण 41 वॉर्डस आहेत. शहराची लोकसंख्येची घनता 11,658 लोक दर चौ.कि.मी. आहे. हे शहर अजिंक्यतारा, येवतेश्वर, आंबेदरे, करंजे, वाडे खेड, कोडोली व गोडोली यांनी सीमित केले आहे.

इ) **स्थान आणि स्थिती** ... सातारा नगरावर आर्थिक आणि भौतिक घटकांचा परिणाम झाला असून भौतिक घटकांमध्ये सातारा शहर अजिंक्यता-याच्या पायथ्याला आहे. अधून मधून उंचवटे आढळतात. हे शहर पूर्वेला आणि उत्तरेला वाढत चालले आहे. शहराचा उतार पूर्व आणि उत्तर दिशेला असून वेण्णा व कृष्णा नद्या 4 कि.मी. अंतरावर आहेत.

ई) **साक्षरता** ... एकूण लोकसंख्येच्या 76.5% लोक साक्षर असून पुरुषामध्ये हे प्रमाण 64.6% आणि स्त्रीयांमध्ये 29% आढळते. यावरून स्त्री पुरुषांच्या साक्षरतेमधील तफावत दिसून येते.

उ) **हवामान** ... सातारा शहराचे हवामान मान्सून प्रकारचे असून उन्हाळा फारसा कडक नसतो. येथे कमाल तापमान 30⁰सी असते आणि किमान तापमान 20⁰ सी असते. वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1125 ते 1250 मि.मि. असते. एकंदरित थंडीचे प्रमाण जास्त आढळते. पश्चिम भागात जोरदार पाऊस असतो. मध्य भागात पावसाचे प्रमाण 700 मि.मि. ते 1000 मि.मि



KARANJE
SADARBAZAR
SAINK SCHOOL
CIVIL HOSPITAL
S.T. STAND
POWI NAKA
Z.P.
SATARA CITY
RAJWADA
SADASHIV RD
MOTI CHOWK
RAJPATH RD
MUNICIPAL OFFICE
MANGALWAR TANK
ADALAT WADA
GODOLI
कामाठीपुरा
साताराशहर

आढळते. पूर्वभाग हा कोरडा असून यात प्रामुख्याने खटाव, प. फलटण, खंडाळा, कोरेगांव हे तालुके येतात. या शहराचे वैशिष्टय म्हणजे या शहराच्या आसपास 25 छोटे छोटे किल्ले आहेत. एकंदरित संपूर्ण वर्षामध्ये कोरडे व आल्हाददायक हवामान असते. शहराचा उतार उत्तरेस असून प्रमुख ओढे उदा. मोळाचा ओढा, जुन्या मोटर स्टॅंडजळचा ओढा हे पुढे कृष्णा व वेण्णा नदीला जाऊन मिळतात.

ऊ) **ऐतिहासिक पार्श्वभूमी** ... ख्रिस्त जन्मापूर्वी सातारा शहरावर बुध्दाचे राज्य होते हे आगाशिव डोंगरावरील शिल्पावरून कळते. 3 -या शतकापासून 13 व्या शतकापर्यंत चालुक्य, राष्ट्रकूट, सिंधण, शिलहार यादव राजा, आणि 14 व्या शतकापर्यंत देवगिरीच्या यादव राजांचे राज्य होते.. यादवानंतर बहामनी राज्य आले. सन 1498 ते 1656 पर्यंत येथे आदिलशहाचे राज्य होते. शिवरायांनी 1663 मध्ये हे शहर व किल्ला जिंकून घेतला. त्यांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने हे शहर जिंकून घेऊन किल्ल्याचे नांव ' अजिंक्यतारा ' ठेवले. 1706 मध्ये परशुराम प्रतिनिधींनी किल्ला जिंकून घेतला. 1708 मध्ये शाहूमहाराजांचा येथे राज्याभिषेक झाला. 1808 मध्ये प्रतापसिंह महाराजांचा ( शाहूंचे पणतू ) राज्याभिषेक झाला. त्यांनी सातारचे नांव इतिहासात अमर केले.

' सातारा ' या नांवाबद्दल अनेक दंतकथा आढळतात. उदा. गावाजवळच्या द-यास ' सातदरा ' म्हणतात. त्यावरून ' सातारा ' हे नांव पडले. अजिंक्यता-याचे जुने नांव सप्तर्षीचा किल्ला ' असे होते. तेथे असणा-या सप्तर्षीच्या देवालयाच्या नांवावरून ' सातारा ' हे नांव प्रचलीत झाले. 3 री व्युत्पत्ती म्हणजे ' सातर ' म्हणजे ' ईशान्य '. भोजराजाची राजधानी पन्हाळागडच्या ईशान्येचे गांव म्हणजे सातारा. 4 थ्या व्युत्पत्तीनुसार औरंगजेबाच्या मुलाने आजिमशहाने किल्ल्यास वेढा दिला तेव्हां किल्ल्यास 17 दरवाजे व बुरूज होते. त्यावरून सतारा हे नांव पडले. ' सात ' म्हणजे ' भरपूर '. सात पासून ' सातर ' व त्यावरून ' सातारा ' असे नांव पडले इ.

ए) **राजकीय महत्व** ... या नगरास ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे व राजकीय वारसा आहे. यशवंतराव चव्हाणांसारखे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री, भारताचे संरक्षण मंत्री, व उपपंतप्रधान हे सातारा जिल्हयाचेच सुपुत्र आहेत. मालोजीराव निंबाळकर, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते, किसन वीर हे सातारा शहरातील धुरंधर राजकारणी होते.

·26·

1962 मध्ये महाराष्ट्रांत ' पंचायत राज्य ' निर्माण झाले. तेव्हांच सातारमध्ये ' जिल्हापरिषद ' निर्माण झाली. यामध्ये प्रतापराव भोसले, चिमणराव कदम, डॉ. भोईटे यांनी कर्तृत्व गाजवले. सातारा शहराचे आमदार बहुतेक वेळा महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात स्थान भूषवितात.


ऐ) **सामाजिक व सांस्कृतिक वारसा** ... वर्तमानकाळ हा भूतकाळातून उदयास येतो. व भविष्याकाळाकडे झेप घेतो. सातारच्या पवित्र भूमीतून उदयास आलेले शाहूमहाराज, म.ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले आणि इतर अनेक समाजसुधारकांनी सामा. प्रगती व विकासात आपले स्थान निर्माण केले. यामध्ये स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निवारण, अनिष्ट रूढी परंपरा, अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम त्यांनी मोठया प्रमाणावर केलेले दिसून येते. ' स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ' हे ठरवून कर्मवीर भाऊराव पाटलांनी येथे गोरगरीबांसाठी ज्ञानाचा वटवृक्ष रूजविला. आज तो कितीतरी फोफावला आहे. ज्ञानाची सर्व क्षेत्रे पादाक्रांत करीत आहे.

ओ) **सातारा शहरातील वैदूंचे स्थान** ... ' वैदू ' जमात प्रामुख्याने सातारा शहरातील ' ' गोडोली ' जवळच्या ' कामाठीपुरा ' भागात रहाते. 1904 साली प्रकाशित झालेल्या ' गॅझेटियर ऑफ द बॉंबे प्रेसिडेन्सी ' मध्ये ' वैदूंची ' नोंद आढळत नाही. वैदू लोकांच्या मुलाखाती नुसार ती 1935 च्या सुमारास सातारमध्ये आली असून सध्या वैदूंचे वास्तव्य ' कामाठीपुरा ' या भागात आहे.

' कामाठीपुरा ' हा भाग सातारच्या ' दक्षिण पूर्व ' दिशेला आहे. प्रामुख्याने 'आदिम' मागास जमाती या शहराच्या मध्यवस्तीपासून लांब व नैसर्गिक दृष्टया प्रतिकूल अशा भूरचनेच्या भागात आढळतात. याठिकाणी शासकीय सुविधा उदा. लाईट, पाणी, ड्रेनेज, गटार यांचा बहुतांशी अभाव आढळतो. कामाठीपुरा ही सातारच्या अग्नेय कोप-यातून ओढयाच्या काठी वसलेली झोपडपट्टी आहे. ती उत्तरेला पारसनीस कॉलनी, पूर्वेला जिल्हापरिषद शाळा, दक्षिणेला अजिंक्यतारा रोड, आणि पश्चिमेला पडीक जमीन यांनी निश्चित केली आहे. या भागाचा समावेश वॉर्ड नं. 11 मध्ये होतो. या वार्डाचे एकूण क्षेत्रफळ 103.85 हेक्टर इतके आहे. वॉर्डाची एकूण लोकसंख्या 5214 आहे. त्यातील वैदूंची संख्या 438 आहे. या वॉर्डमध्ये लोकसंख्येची घनता 31 दर चौ.कि.मी. आहे. वॉर्डातील एकूण साक्षर 2696 असून यामध्ये पुरूष 1744 व स्त्रीया 952 आहेत. निरक्षरांची संख्या 2538 असून पुरूष 1780 व स्त्रीया 758 आहेत. या वॉर्डास पाणीपुरवठा कृष्णा नदीपासून होतो. वीज, सार्वजनिक पाणी पुरवठा, सार्वजनिक संडास इ. सोयी उपलब्ध असलेल्या आढळतात.

* माहितीची उगमस्थाने. 1) सातारा नगर वाचनालय. 27
2) सातारा नगर परिषद.

नकाशा क्र.७


COLLECTORS OFFICE
R S NO 175 B
531
SHIVAJI COLLEGE
OLD NATIONAL HIGHWAY
R S NO 199
535
153
209
264
वाडी
कामाठीपुरा